पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३८८ दिनांक - २५/०५/२०२३**

**सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर**

**आयपीएल क्रिकेट बेटींगच्या मास्टर माईंडवर इऑन आयटी पार्क, खराडी भागात छापा टाकुन छत्तीसगढ, पंजाब व बिहार या परराज्यातील एकुण ०६ आरोपी बुकी ताब्यात.**

दि.२४.०५.२०२३ रोजी वरीष्ठांकडुन गोपनिय माहिती प्राप्त झाली की, सध्या भारतामध्ये सुरू असलेल्या टाटा आयपीएल २०२३ च्या क्रिकेट मॅचवर गॅलक्सी वन सोसायटी, प्लॅट नं ए-६९०२,नववा मजला, खराडी पुणे येथे राहते प्लॅट मध्ये काही इसम ऑन लाईन क्रिकेट बेटींग खेळत व खेळवत आहेत.

सदर गोपनिय बातमीचा खातरजमा करण्याकरीता सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकुन तेथे हजर असलेले छत्तीसगढ, पंजाब व बिहार या परराज्यातील सहा इसम मिळुन आले. त्या इसमांच्या ताब्यातुन मिळुन आलेला लॅपटॉप व मोबाईल चेक केले असता वेगवेगळया वेबसाईटच्या लिंकद्वारे ग्राहकांना लॉगइन आय डी व पासवर्ड देवुन त्याद्वारे बँक खात्यामध्ये ऑनलाईन पैसे स्विकारुन सट्टा घेत असुन क्रिकेट बेटींगचे सट्टयाबद्दल मोबदला म्हणुन क्रिकेट मॅचचे हार जीतवर काही रक्कम ऑन लाईन स्विकारत असल्याचे आढळुन आले.

सदर इसम हे वरील वेब साईटचा वापर करून सध्या भारतात सुरु असलेल्या टाटा आयपीएल २०२३ च्या मुंबई इंडीयन्स व लखनौ सुपर जायंट्स या लाईव्ह क्रिकेट सामन्यांवर ऑनलाईन क्रिकेट बेटींग करीता ग्राहकांना बेकायदेशरपणे लॉगीन आय डी पासवर्ड देवुन त्या बदल्यात क्रिकेट सामन्याच्या हारजीतवर स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे ऑनलाईन रक्कम स्विकारुन अप्रामाणिकपणे लबाडीचे इराद्याने ग्राहंकाची फसवणुक करुन ऑनलाईन क्रिकेट व इतर सट्टा प्रकार खेळत व खेळवीत असताना मिळुन आले आहेत. तसेच नमुद इसमांनी टाटा आयपीएल २०२३ मधील यापुर्वी झालेल्या क्रिकेट मॅचवर सट्टा घेतलेला व खेळवलेला आहे. तसेच आरोपींचे इंडसइंड व आयडीएफसी बँक खात्यात असलेले १०,००,०००/- रु. (दहा लाख ) सीज करण्यात आले आहे.

सदर ०६ परप्रांतीय इसमांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन ४०,०००/- रु. किमतीचे दोन लॅपटॉप, ४,२३,५००/- रु.किमतीचे १६ मोबाईल हॅन्डसेट, १,०००/- रु.किमतीचा एक वायफाय राऊटर व रोख रक्कम १६,२४०/- रु. असा एकुण ४,८०,७४०/- रु. चा. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईमध्ये सीज करण्यात आलेले १०,००,०००/- रु. (दहा लाख रु.) व आरोपींकडुन जप्त केलेला ४,८०,७४०/- रु. चा. मुद्देमाल असा एकुण १४,८०,७४०/- रु. (चौदा लाख ऐंशी हजार सातशे चाळीस रु.) मुद्देमाल जप्त झालेला आहे. तसेच सदर आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेविरूध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. २२६/२०२३, भा. द. वी. कलम ४२०, ३४, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४ (अ), ५ सह भारतीय टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि अनिकेत पोटे सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करीत आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे, पुणे शहर, श्री. अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,भरत जाधव तसेच सपोनि अनिकेत पोटे,सपोनि राजेश माळेगावे,पोलीस अंमलदार राजेंद्र कुमावत, बाबा कर्पे, तुषार भिवरकर, इम्रान नदाफ, अमित जमदाडे, संदीप कोळगे, ओंकार कुंभार या पथकाने यशस्वी केली आहे.